# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ०५.१०.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०४.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १० केसेसमध्ये १० ईसमावर कारवाई करून एकुण १,१९,९२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण ७,१६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०१ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये १८ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ७८ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १७२ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ४५ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ६९ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ४८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०७ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १२ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१७४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०७ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २२ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,७२२ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ५,१८,२५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) कळमणा पोलीसांची कामगिरी :— ई—रिक्षा चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०३.१०.२०२६ रोजी, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, कळमणा रेल्वे स्थानक परिसरात एक इसम चाकु घेऊन धुमाकुळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, प्राप्त वर्णनाचा इसम हा हातात चाकु घेऊन येणारे—जाणारे लोकांना शिवीगाळ करतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील चाकु काढुन घेऊन, त्यास निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव ओमप्रकाश उर्फ ढोकु सुरेश निषाद वय १९ वर्षे रा. घर क्र. ११७७/बी/२४, रुपचंद किराणा जवळ, पुराना बाजार चौक, डिप्टी सिग्नल, संजय नगर कळमणा, नागपूर असे सांगीतले. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने दिनांक १८.०९.२०२६ रोजी २२.०० वा. चे सुमारास चिखली गेट परिसरातुन एक ई—रिक्षा चोरी केल्याचे सांगितले. गुन्हे अभिलेख तपासला असता, पोलीस ठाणे येथे ई—रिक्षा क्र. एम.एच ४९ सी.एफ १२४५ चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे दिसुन आले.

आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु व ई–रिक्षा असा एकुण ५०,५००/– रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडुन एक वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि करीम पठान, पोउपनि. गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललित शेंडे, अविनाथ ग्वालबंशी, रोशन निंबर्ते यांनी केली.



**<u>३) भांडेवाडी पोलीसांची कामगिरी :– अवैध दारू वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०४.१०.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, भांडेवाडी पोलीसांना माहिती मिळाली की, काळया रंगाची ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ३१ एफएन ६१३४ ने एक ईसम अवैधरित्या दारुची वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हद्यीत, एचबी टाऊन सोसायटी गेटचे बाजुला, गोल्ड लोन बँक समोर सापळा रचुन नमुद मोपेडला थांबविले. चाकलास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव विक्रमसिंग प्रमोदसिंग चव्हाण वय ४० वर्षे रा. अक्षय सरोदेचे घरी किरायाने, प्लॉट क्र. १३०, शिवगिरी रोड, ओमनगर, मानकापुर, नागपूर असे सांगितले. पंचासमक्ष त्याचे वाहनाची झडती घेतली असता, गाडीचे डिक्कीमध्ये जॉगर मास्टर व जॉनी वॉकर कंपनीची विदेशी दारु मिळून आली. आरोपीस विचारणा केली असता, त्याने उडवा–उडवीची उत्तरे दिल्याने, अवैधरित्या दारुसाठ्याची वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे ताब्यातून विदेशी दारू, ०१ मोबाईल फोन व मोपेड वाहन असा एकुण १,०२,७००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे भांडेवाडी येथे कलम ६५(अ)(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमणा) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. नितीन चरडे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.




**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे खापरखेडा :— रेती चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०४.१०.२०२६ चे ०५.३० ते ०६.३० वा. चे दरम्यान, खापरखेडा पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात, पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना, त्यांना माहिती मिळाली की, अशोक ले—लॅन्ड कंपनीचे १० चाकी ट्रकने रेतीची अवैधरित्या वाहतुक केली जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, त्यांनी जुने भानेगावकडे जाणारे रोडवर, सापळा रचुन अशोक लेलॅन्ड कंपनीचे टिप्पर क्र. एम.एच. ३४ ए.बि. १०२१ ला थांबवुन, चालक व सोबत यास त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नावे १) दिलीप काशिनाथ निपाणे रा. वार्ड क्र. १, बिना संगम, कामठी ,खापरखेडा व त्याचा सोबती मालक २) सुरेश गणेश बोंडे रा. बिना संगम, कामठी, खापरखेडा असे सांगीतले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण ०५ ब्रास रेती मिळुन आली. आरोपींना रेतीचे कागदपत्रांची विचारणा केली असता, त्यांनी उडवा—उडवीची उत्तरे दिल्याने, नमुद रेतीची अवैधरित्या वाहतुक केली जात असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन ०५ ब्रास रेती व टिप्पर ट्रक असा एकुण किंमती १५,३०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता अवैद्यरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक करतांना समक्ष मिळुन आल्याने, सरतर्फे फियादी पोअं. अमित खोब्रागडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. अविनाश निकाळजे ८८८८०५६८५० यांनी आरोपींविरूध्द कलम ३०३(२),३(५) भा. न्या.सं. सहकलम ४८(७),४८(८) म.ज.म.सं. कायदा, सहकलम ४,२१ खाण आणि खनिज अनिधियम अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जुनी कामठी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.१०.२०२६ चे २३.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अंकित शेषराव वाडीवे वय २६ वर्ष रा. पोटभरे चाळ, कांद्री कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर यांचा मोठा भाऊ नामे अजय शेषराव वाडीवे वय ३० वर्ष हा त्याचे होंडा शाईन मोटार सायकल क्र. एमएच ४० सीएल २३०५ ने जात असता, पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत, नागपूर—कामठी रोडवर साईबाबा कॉलनीचे समोरील मेट्रो पिलर क्र. २ पी/२११ जवळ कोणत्यातरी अज्ञात वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटार सायकलला धडक मारून, त्यांना गंभीर जखमी केले व जखमीस कोणतीही मदत न करता, तेथुन पळुन गेला. पोलीसांनी गंभीर जखमी यास उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

यاप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जुनी कामठी येथे पोउपनि स्वप्निल चव्हाण ७०२०९७४५६० यांनी अज्ञात वाहनचालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे यशोधरानगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.१०.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०३.१०.२०२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत ५६०, गोंड मोहल्ला, यशोधरानगर, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. यशोदा विश्वनाथ कुंभारे वय ५६ वर्ष हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुलीकडे गोधनी, नागपूर येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य लाकडी दरवाज्याचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख २,००,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,८७,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. नागरगोजे ८४५९६९७३७० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**पोलीस ठाणे पाचपावली :—** फिर्यादी जईंद्र फागुजी निमजे वय ५६ वर्षे, रा. बाळाभाऊपेठ, विठोबा आखाडयासमोर, पाचपावली, नागपूर यांनी पोलीस ठाण पाचपावली येथे तक्रार दिली की, त्याचा लहान भाऊ देवेंद्र फागुजी निमजे वय ५० वर्षे हा मानसिक रोगी असुन, त्याचा उपचार मनोरुग्णालय, नागपूर येथे सुरु आहे. दिनांक २९.०९.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास फिर्यादीचे लहान भावाने फिर्यादीस बाहेरुन येतो असे म्हणून घरुन निघुन गेले असता, तो घरी परत आले नाही. शोध घेतला असता, मिळून आले नाही. त्यांना कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ३ इंच, केस—काळे पांढरे व समोरुन टक्कल पडलेले, डोळे—काळे, दाढी—वाढलेली, अंगात— ग्रें रंगाचा फुल शर्ट व कत्था रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे पाचपावली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३८, १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



देवेंद

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**